# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

**दिनांक २०.०९.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) गुन्हेशाखा वाहनचोरी विरोधी पथक पोलीसांची कामगीरी :— अवैध बनावटी दारूसाठा जप्त.**

दिनांक २०.०९.२०२६ चे ०२.३० ते ०५.१० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा वाहनचोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, पोहवा अजय शुक्ला यांना मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, सापळा रचुन पोलीस ठाणे वाडी हद्दीत, अमरावती रोड, आठवा मैल, आठवडी बाजार येथे एका अशोक लेलॅन्ड कंपनीचा ट्रक क्र. एमएच ४० सीडी १५९१ ला थांबवुन चालकास पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव अब्दुल तौसिफ अब्दुल हफिज वय ३४ वर्षे रा. गवळीपुरा, आजाद नगर, गिट्टीखदान, नागपूर असे सांगितले. पंचासमक्ष ट्रकची पाहणी केली असता, त्यात प्लास्टीकचे भंगार भरलेले दिसुन आले. ट्रकची बारकाईने पाहणी केली असता, त्यामध्ये भंगाराखाली देशी दारुच्या बॉटल्स असलेले एकुण ३९० खोके लपविल्याचे दिसून आले. दारुच्या खोक्यांची पाहणी केली असता, प्रत्येक खोक्यात ९० मिलीच्या १०० बॉटल्स अशा एकुण ३९,००० बॉटल्स प्रति. बॉटल कि. ४०/— प्रमाणे कि. १५,६०,०००/— रु. चा मुद्येमाल अवैध दारूसाठा मिळुन आला. आरोपीस मुद्देमालाबाबत विचारणा केली असता, त्याने नमुद मुद्देमाल हा अवैध बनावट दारु असुन पाहिजे आरोपी अंकुश उर्फ अन्ना सुधाकर कुंचनवार वय ३८ वर्ष रा. यशवंतनगर, हिंगणघाट, जि. वर्धा याने धुळे महाराष्ट्र येथुन आणण्याकरीता पाठविले होते. तेथे त्याचे सांगण्यावरुन काही इसमांनी माल भरुन आणुन दिला होता व दारु ही आलापल्ली, गडचिरोली येथे घेऊन जात असल्याचे सांगितले. आरोपीचे ताब्यातुन अवैध दारुसाठा, १ मोबाईल व अशोक लेलॅन्ड कंपनीचा ट्रक भंगार असलेला असा एकुण २८,७०,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वरील मुद्येमाल हा बनावट असल्याचे शक्यतेवरुन, राज्य उत्पादन शुल्क विभागाशी संपर्क साधुन जप्त मुद्येमालाची तपासणी केली असता, प्रथमदर्शनी मुद्येमाल बनावट असल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. आरोपी हे अवैद्यरित्या बनावट दारूचा साठा बाळगुन वाहतुक करतांना समक्ष मिळुन आल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे वाडी येथे ३१८(४),३३६(३),३४० भान्यासं. सहकलम ६५(अ),६५(ई) महा. दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह वाडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दिलीप चंदन, पोहवा. विलास कोकाटे, रोशन तिवारी, अजय शुक्ला, नितीन वर्मा, सचिन बढीये, पोअं. राहुल कुसरामे व चापोअं. अभय ढोणे यांनी सायबर सेलचे पोउपनि विवेक झिंगरे व त्यांचे पथकाचे मदतीने केली.




**२) एस्कॉर्ट पथकाची कामगीरी :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्या ईसमाविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १९.०८.२०२६ चे रात्री, एस्कॉर्ट पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांनी प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थाचे विक्रीबाबत मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे राणा प्रतापनगर हद्दीत, सुभाष नगर, जयताळा रोड येथील गुड्डु पान पॅलेस येथे राणा प्रतापनगर पोलीसांसह पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, पान टपरी मालक जितेंद्र नारायण गुप्ता वय ३६ वर्ष रा. नाईक नगर, मानेवाडा रोड, रिंग रोड हा पानटपरीमध्ये हजर मिळून आला. पानटपरीची पंचासमक्ष पाहणी केली असता, पानटपरीमध्ये विमल, राजश्री, पान पराग, केपी ब्लॅक असे वेगवेगळ्या प्रकारचे शासन प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुजन्य पदार्थ तसेच विक्रीचे रोख असा एकूण २१,३२६/— रु. चा मुद्देमाल मिळून आल्याने जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता शासन तंबाखुजन्य पदार्थ बेकायदेशीर विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. पानटपरी चालकाविरूध्द पोलीस ठाणे प्रतापनगर येथे कलम २२३,२७४,२७५ भान्यासं. सहकलम ३३,१३१ मपोका अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून आरोपीस मुद्देमालासह प्रतापनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे.

वरील कामगिरी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनात सपोनि. भगवान कोळी, पोउपनि. साईनाथ काकरवाल, पोहवा. विजय गिरी, आशिष गायधने पोअं. अर्शद शेख, मनोज निमकी, दिनेश क्षीरसागर व चंद्रकांत यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे कोराडी :— जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना त्वरित अटक.**

फिर्यादी सतिष रामदास मानकर वय ३९ वर्षे रा. काकडे ले आऊट, वार्ड क्र. ०५, दहेगाव रंगारी, नागपुर हे ऑर्डनन्स फॅक्ट्री अंबाझरी येथे लेबरकाम करतात. त्यांची मॉर्निंग शिफ्ट असल्याने, दिनांक २०.०९.२०२६ चे ०५.३० वा. चे सुमारास, ते त्यांची दुचाकी युनिकॉर्न क्र. एमएच ४० बीए ३४४५ ने सोबत मित्र दीपक कोहळे याचेसोबत जात असतांना, कोराडी देवि मंदीरकडे जाणारे रोडवर थांबले असता, त्यांचेजवळ परिचीत असलेले १) प्रफुल उर्फ मद्याक किशोर राऊत वय ३० वर्ष २) आशिष ओंकार वासनिक वय ३० वर्ष दोन्ही रा. महादुला कोराडी हे फिर्यादीजवळ आले व त्यांनी फिर्यादीस क्यो बे, यहा क्या कर रहे हो' चल तेरे जेब मे क्या है असे म्हणुन फिर्यादीचे पॅन्टचे खिशातुन चॉकलेटी रंगाचे पाकीट, ज्यामध्ये २,४००/— रु. रोख व इतर कागदपत्रे असलेले व शटचे खिशातुन विवो कंपनीचा मोबाईल जबरीने काढुन घेतला तसेच युनिकॉर्न गाडीची चाबी जबरीने हिसकावून फिर्यादी व मित्राला धक्का देऊन गाडीसह पळून गेले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोराडी येथे आरोपीविरूध्द कलम ३०९(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे तपासात कोराडी पोलीसांनी त्वरीत दखल घेऊन, घटनास्थळी भेट देऊन, पोउपनि अंबेपवार व त्यांचे पथकातील अंमलदार यांनी आरोपींचा शोध घेऊन दोन्ही आरोपींना मुद्येमालासह ताब्यात घेतले आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे यशोधरानगर :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १९.०९.२०२६ चे १९.५५ वा. चे सुमारास, यशोधरानगर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, पोलीस ठाणे हद्यीत, पंचवटी नगर ग्राऊंड येथे गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा एक इसम हातात चाकु घेऊन धुमाकुळ घालतांना दिसून आला. त्याचेजवळ जात असतांना, तो पोलीसांना पाहून पळू लागला, त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेतले व निशस्त्र केले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव गुरुप्रितसिंग उर्फ पाजी परमिंदरसिंग भाटीया वय १९ वर्षे, रा. धम्मदीपनगर, पाच क्वॅार्टर, यशोधरानगर, नागपूर असे सांगीतले. त्याचे ताब्यातुन एक लोखंडी धारदार चाकु कि. ४००/—रू. .चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने धारदार लोखंडी चाकु बाळगुन धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोअं. मनिष झरकर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे यशोधरानगर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का. सहकलम १३५ म.पो. का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे बेलतरोडी :— हद्दपार इसमास अटक.**

दिनांक २०.०९.२०२६ चे ०१.०० वा. चे सुमारास, बेलतरोडी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्यीतुन हद्यपार असलेला एक हद्यपार इसम हा वर्धा रोड, खापरी, भारत पेट्रोल पंपजवळ फिरत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन नमुद ठिकाणी गेले असता, तिथे प्राप्त वर्णनाचा इसम दिसुन आला. तो पोलीसांना पाहून पळण्याचे तयारीत असता, त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सुरज भारत गायकवाड वय २७ वर्षे रा. शांतीनगर, ईसासनी, श्रीरत्न बुध्द विहारजवळ, हिंगणा रोड, नागपूर असे सांगीतले. त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ११/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले.

आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे बेलतरोडी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** फिर्यादी प्रणय हेमराज हरीणखेडे वय २२ वर्ष रा. भारतीय लोक कल्याण सोसायटी, भवानी नगर, पारडी, नागपूर यांचे मुळगाव देहुटोला, ता. तिरोडा, जि. गोंदीया आहे. ते सागर महल्ले यांचेकडे कारचालक म्हणुन काम करतात. त्यांना गावाकडे खाजगी काम असल्याने, त्यांनी त्यांचे सोबत गावावरुन आलेला त्यांचा नातेवाईक हर्षल मदन कटरे वय १६ वर्ष रा. हंसारा, ता. तुमसर, जि. भंडारा व त्यांचा साळा देविदास चंद्रकुमार टेंभरे वय २५ वर्ष रा. प्लॉट क्र. ११५, दुबे नगर—सी, हुडकेश्वर, नागपूर यांना सोबत घेऊन दिनांक २०.०९.२०२६ चे ०३.०० वा. चे सुमारास कारने देहुटोला येथे जात असता, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत,

आऊटर रिंग रोड, हॉटेल लड्डु ढाब्याचे जवळ अचानक कारचा टायर फुटल्याने, कार रस्त्याचे कडेला जाऊन पलटी झाली. फिर्यादी हे कारमधुन बाहेर निघाले व पाहिले असता, कारचे डावे बाजुचा मागील टायर फुटलेला होता. हर्षल हा गाडीमध्ये मागील सीटवर जखमी होता व फिर्यादीचा साळा देविदास हा कारचे बाहेर उजवे बाजुला रस्त्यावर खाली गंभीर जखमी अवस्थेत पडलेला दिसला. गंभीर जखमी फिर्यादीचा साळा यास उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी देविदास यास तपासुन मृत घोषित केले. फिर्यादी व हर्षल यांचेवर उपचार करण्यात आलेला आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांचे सुचनेवरुन पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. प्रविण वाकडे यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरु आहे.

**स्वा/—**
**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**